# BDC LIBRARY

## New Paper Clipping

### A.Y. 2024-2025

# रानभाज्यांची माहिती आजच्या पिढीला होणे गरजेचे : याज्ञसेन पाटणकर

▲ पाटण, दि. १० : पावसाळ्यात सह्याद्रीच्या डोंगरात अनेक पौष्टिक आणि आयुर्वेदिक रानभाज्या आजही पहायला मिळतात. या रानभाज्यांची माहिती आजच्या पिढीला होणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन कोयना एज्युकेशन सोसायटीचे संचालक श्रीमंत याज्ञसेन पाटणकर यांनी केले.

बी. डी. कॉलेज, पाटण येथे आयोजित रानभाजी महोत्सवाच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी रोटरी क्लबच्या सेक्रेटरी शिलादेवी पाटणकर, समन्वयक डॉ. हेमलता कांटे, वनस्पती शास्त्रचे विभाग प्रमुख प्रा. डॉ. भरत जाधव, प्रा. डॉ. मंजूषा शिंदे, प्रा. प्रतिभा झुळझुळे, प्रा. झुळझुळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

याज्ञसेन पाटणकर म्हणाले, पाटण तालुक्यात जुन्या पिढीतील लोकांना रानभाज्यांची चांगलीच जाण आहे, हे आजच्या पिढीला माहिती झाले पाहिजे. या रानभाज्यांचं महत्त्व इतरांनाही कळावं, हे या महोत्सवाचे उद्दिष्ट आहे.



मार्गदर्शन करताना श्रीमंत याज्ञसेन पाटणकर, व्यासपीठावर शिलादेवी पाटणकर, डॉ. हेमलता काटे, प्रा. डॉ. भरत जाधव व इतर.

निसर्गातील रानभाज्यातून महत्त्वपूर्ण असे जीवनसत्व शरीराला मिळतात. रासायनिक तसेच कुठलेही हानिकारक घटक या रानभाज्यांत नसल्यामुळे आरोग्यासाठी त्या अतिशय गुणकारी असतात. तेलात आणि कुठलाही भडक मसाला न वापरता या भाज्या बनवतात म्हणून वर्षातून एकदा तरी या रानभाज्या खाल्ल्या पाहिजेत, असे त्यांनी सांगितले.

या रानभाजी महोत्सवात जवळपास १५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यात अंबाडी, वाघाटी, भारंगी, मुरडाची भाजी, शेवगा, ढेसा, बुबुळ शेंग भाजी, बीट, हलवा, केक, पराटा, मूग, उदीड भाजी, टाकळा पाने भाजी, करटोल भाजी, सुरण भाजी, कारल भाजी, आलू वड्या या रानभाज्या पहायला मिळाल्या. परीक्षक म्हणून प्राचार्य चेतन सावंत (हॉटेल मॅनजमेंट, पाटण) व प्रा. सतीश गायकवाड यांनी काम केले.

प्रा. डॉ. भरत जाधव यांनी प्रास्ताविकात रानभाज्याचे आहारातील महत्त्व व आयुर्वेदिक भाज्यांचे महत्त्व सांगितले. या महोत्सवात विजेत्यांना रोख रक्कम आणि प्रमाणपत्र देण्यात आले. प्रा. कोमल पवार यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. मंजूषा शिंदे यांनी आभार मानले. कार्यक्रमास ज्युनियर आणि सिनियर भागातील विद्यार्थी आणि परिसरातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.